सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक स्मारक ३११३/ प्र. क्र.३०८/कार्या- २९, दि. २३/०३/२०२६

**विषय:-** "राष्ट्रपुरुष/ थोर व्यक्ती यांची स्मारके उभारणे व त्यांची देखभाल करणे "हा विषय हाताळण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक स्मारक ३११३/प्र. क्र.३०८/कार्या- २९, दि. २३/०३/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३२३१५४३४४३५०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 25-03-2026 13:18:11

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र १ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

"राष्ट्रपुरूष/ थोर व्यक्ती यांची स्मारके उभारणे व त्यांची देखभाल करणे" हा विषय हाताळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्रमांक: स्मारक ३११३/प्र.क्र.३०८/ कार्या-२९

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २३ मार्च, २०२६

संदर्भ: १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. स्मारक ३११३/प्र.क्र.३०८/२९, दिनांक २१.०८.२०१३.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. स्मारक ३११३/प्र.क्र.३०८/२९, दिनांक १२.०१.२०१६

प्रस्तावना:

राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती, स्वातंत्र्य सैनिक, इतिहास प्रसिध्द व्यक्ती, संत, महात्मे, राजकारणातील प्रसिध्द व्यक्ती यांच्या स्मारकांच्या उभारणीद्वारे देशाच्या/राज्याच्या सांस्कृतिक वारशाची जपणूक होत असते. राष्ट्र पुरुषांच्या स्मारकांची उभारणी पुढील पिढ्यांना दिशा देणारी व देशाच्या प्रगतीसाठी प्रेरणादायी ठरते.

राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांच्या स्मारकांच्या उभारणीबाबत संदर्भाधीन क्र.१ वरील दिनांक २१.०८.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांच्या स्मारकाचे नियोजित ठिकाण नगर परिषद / नगरपालिका /महानगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रात असल्यास नगर विकास विभागाने आणि सदरचे ठिकाण ग्रामपंचायत / पंचायत समिती / जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात असल्यास ग्राम विकास व पंचायत राज विभागाने स्मारकाची उभारणी करावी, असा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच संदर्भाधीन क्र.२ वरील दि.१२.०१.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांची स्मारके उभारण्याबाबतची सविस्तर मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आली आहेत. तसेच सदर शासन निर्णयान्वये एखाद्या वास्तूस राष्ट्रीय स्मारक घोषित करणे, त्याची देखभाल व तद्नुषंगीक बाबी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून कार्यवाही करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

सन २०१३ पूर्वीच्या स्मारक उभारणीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेकडून प्रस्ताव तयार करुन त्यास तांत्रिक मान्यता प्रदान करणे, शासनाकडून प्राप्त प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेनंतर कार्यादेश निर्गमित करणे त्याचप्रमाणे स्मारकाच्या संपूर्ण उभारणीची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेकडून केली जाते व स्मारक उभारणी पश्चात देखभालीची कार्यवाही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून/यंत्रणेकडून केली जाते. एकंदरीत स्मारक उभारण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाची महत्वाची भुमिका असल्याचे दिसून येते. दिनांक २१.०८.२०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार ग्रामीण भागातील स्मारक उभारणीचा विषय ग्रामविकास विभागाकडे व नागरी भागातील स्मारक उभारणीचा विषय नगर विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला असून केवळ सन २०१३ पूर्वीच्या स्मारक उभारण्याबाबतची कार्यवाही करणे हा विषय सामान्य प्रशासन विभागाकडून सद्यस्थितीत हाताळण्यात येत आहे.

शासन कार्यनियमावली अंतर्गतच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला नेमून दिलेल्या विषय क्र.४ येथे **"संविधानाच्या सातव्या अनुसुचितील सुची एक मधील नोंद क्रमांक ६७ मध्ये अंतर्भुत असलेल्या ऐतिहासिक स्मारकांखेरीज ऐतिहासिक स्मारके ( तसेच पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाखालील नोंद क्र.३० व नोंद क्र.३९ पहा)"** हा विषय सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निहीत केला आहे. तसेच, स्मारक उभारण्याच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाकडे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नाही. किंबहुना मंत्रालयीन स्तरावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अनुभवी तांत्रिक अधिकारी/अभियंते कार्यरत आहेत. त्यामुळे स्मारक उभारणी व देखभाल सारख्या तांत्रिक बाबी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हाताळणे संयुक्तिक आहे.

सबब, उक्त उल्लेखित केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, सामान्य प्रशासन विभाग सन २०१३ पूर्वीच्या स्मारकांच्या अनुषंगाने कार्यवाही करत असलेला संपूर्ण विषय सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय:-</u>**

१. राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती, स्वातंत्र्य सैनिक, इतिहास प्रसिध्द व्यक्ती, संत, महात्मे, राजकारणातील प्रसिध्द व्यक्ती यांच्या स्मारकांच्या उभारणी बाबत सन २०१३ पूर्वी कार्यवाही मध्ये असलेला विषय सामान्य प्रशासन विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात येत आहे.

२. राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती, स्वातंत्र्य सैनिक, इतिहास प्रसिध्द व्यक्ती, संत, महात्मे, राजकारणातील प्रसिध्द व्यक्ती यांच्या स्मारकांच्या उभारणीच्या अनुषंगाने सर्व धोरणात्मक बाबी, निधी अर्थसंकल्पित करणे व निधी वितरीत करणे, देखभाल व डागडुजी करणे तसेच स्मारकांसंदर्भातील सर्व विधानमंडळ बाबी यापुढे सार्वजनिक बांधकाम विभागाने हाताळाव्यात.

३. स्मारक उभारणी या विषयाबाबतची सर्व कागदपत्रे/नस्त्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात याव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३२३१५४३४४३५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by HEMANT ANANT MAHAJAN
Date: 2026.03.23 15:45:23 +05'30'

**(हेमंत महाजन)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव
४. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक
५. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
७. मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
८. मा.प्रधान सचिव/सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व मंत्रालयीन विभाग
११. सर्व विभागीय आयुक्त
१२. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१३. सर्व जिल्हाधिकारी

१४. संचालक, कला संचालनालय, मुंबई

१५. मुख्य वास्तू शास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

१७. सर्व पोलीस आयुक्त,

१८. सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक

१९. मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका/ नगर परिषदा

२०. निवड नस्ती/ कार्यासन-२९, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई